# शुध्दीपत्रक

**सहायक संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, सामान्य राज्य सेवा, गट- अ (जाहिरात क्रमांक ४२/२०१८, दिनांक २८/०८/२०१८) या पदासाठी दिव्यांग उमेदवाराचे अर्ज स्विकारण्याबाबत.**

सहायक संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, सामान्य राज्य सेवा ,गट अ या पदाकरीता आयोगाकडून जाहिरात क्रमांक : ४२/२०१८, दिनांक २८/०८/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर जाहिरातीमध्ये अनु. क्र.२.२ वर शासनाच्या दिनांक ०७ सप्टेंबर, २०१७ च्या शासन निर्णयाच्या आधारावर प्रस्तुत पदासाठी दिव्यांग उमेदवार पात्र नाहीत असे नमूद करण्यात आले होते.

शासनाने त्यानंतर दिनांक १५/०९/२०१८ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तुत पदाकरीता **सामाजिक न्याय विभागाच्या शुध्दीपत्रक क्रमांक : न्यायाप्र-२०१५/प्र.क्र.१४/अ.क.२, दिनांक ०१/०९/२०१५** नुसार दिव्यांग (OL) उमेदवारांचे अर्ज स्विकारावेत असे कळविलेले आहे. ही बाब विचारात घेता संबंधीत पदाकरीता अर्ज स्विकारण्याची मुदत दिनांक २४/०९/२०१८ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

विहित पद्धतीने अर्ज सादर करून ऑनलाईन शुल्क भरण्याची, तसेच स्टेट बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरण्याकरिता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक २४/०९/२०१८ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल. चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक २५/०९/२०१८ पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

ठिकाण : मुंबई — कक्ष अधिकारी

दिनांक : १७ सप्टेंबर, २०१८ — महाराष्ट्र लोकसेवा आयोग